महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्रमांक पोप्रमा-१११७/प्र.क्र.५५६/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ७ मे २०१८.

विषय :- पोलीस ठाणे, शिराढोण, तालुका-कळंब, जिल्हा-उस्मानाबाद, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ उस्मानाबाद-शिराढोण-पो.ठा./ २६२/ २०१७, दिनांक १६.१०.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी पोलीस ठाणे, शिराढोण, तालुका-कळंब, जिल्हा-उस्मानाबाद, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कळंब, यांनी सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार तयार केलेले रु.१६५.७४ लक्ष इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले असून ते (१) कार्यकारी अभियंता, बांधकाम (सा.बां.) विभाग, उस्मानाबाद, (२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, उस्मानाबाद, आणि (३) पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.१६५.७३ लक्ष** असे सुधारित केले आहेत आणि, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

४. त्या अनुसार, पोलीस ठाणे, शिराढोण, तालुका-कळंब, जिल्हा-उस्मानाबाद, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी **रु.१६५.७३ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

1) बांधकामाचा नमुना नकाशा, मांडणी नकाशा आणि विस्तृत नकाशा यांना वास्तुशास्त्रज्ञाकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.
2) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदींबाबत विस्तृत खर्चाचे अंदाज मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करताना शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४, अनुसार कार्यवाही करावी.
४) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक बीडीजी-२०१७/ प्र.क्र.६०/ इमारती-२, दिनांक ०७.०७.२०१७, अनुसार कार्यवाही करण्यात यावी.
५) निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करु नये.
६) खर्चाचे अंदाज हे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, औरंगाबाद, यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, (४०७० ०२११), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७८०/इमा-२, दिनांक २१.११.२०१७, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५०९१८५६२०६९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.05.09 18:56:54 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद.
३) पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.

प्रत :-

१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, औरंगाबाद *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, उस्मानाबाद *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
३) कार्यकारी अभियंता, बांधकाम (सा.बां.) विभाग, उस्मानाबाद *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
४) जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
६) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड फाईल (पोल-७).